Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- VII ISSUE- XI NOVEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# विरोधी पक्षाची भूमिका

राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ
जिल्हा लातूर – 413544

इंग्लंडप्रमाणे भारताने लोकशाहीचा स्वीकार केला आहे. राजकीय पक्षाची लोकशाहीमध्ये अत्यंत महत्वाची भुमिका असते. सरकारमध्ये राजकीय पक्षांचे साधारणः सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष असे दोन प्रकारे विभाजन केले जाते. ज्या पक्षाला निवडणूकीत बहुमत मिळते त्या पक्षाला सत्ताधारी पक्ष म्हणतात. अनेक वेळेस असे दिसून येते की, कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नाही तेंव्हा अनेक पक्ष मिळून सरकार बनवले जाते. या संयुक्त सरकारमधील मित्रपक्षालाही सत्ताधारी पक्ष असे म्हणतात. ज्या पक्षाला निवडणूकीत बहुमत प्राप्त होत नाही किंवा जो पक्ष विरोधी बाकावर बसतो त्याला विरोधी पक्ष असे म्हणतात. शासनाची सर्व सत्ता ही सत्तारूढ पक्षाकडे असते. त्या सत्तेवर नियंत्रण ठेवण्याचे महत्वाचे काम विरोधी पक्षाला करावे लागते. त्याशिवाय सरकार आपले काम योग्य पध्दतीने करू शकत नाही.प्रत्येक सभागृहातील विरोधी पक्षाचा नेता वेगवेगळा असतो. विरोधी पक्षाच्या बाकावर बसेलेल्यापैकी सर्वात अधिक साथ असलेल्या पक्षाच्या नेत्याला विरोधी पक्षाचा प्रमुख नेता केला जातो. सभागृहामध्ये विरोधी पक्षाच्या नेत्याला महत्वाचे स्थान असते. त्याला कॅबिनेटचा दर्जा असतो. सत्ताधारी पक्ष कोणताही निर्णय घेताना विरोधी पक्षाच्या नेत्याला आपल्या विश्वासात घेऊन निर्णय घेण्याचा प्रयत्न करत असतो. विरोधी पक्षाच्या नेत्याला पर्यायी पंतप्रधान असेही म्हटले जाते.

भारतामध्ये 1952 ते 1967 पर्यंत विरोधी पक्ष नावाला होता नव्हता म्हटले तरी चालेल अशी परिस्थिती त्या काळात होती. गैरकाँग्रेस वादाच्या आधारावर 1869 साली डॉ. रामसिंह याला विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता देण्यात आली. 1977 साली विरोधी पक्षनेत्याला महत्व प्राप्त झाले. या काळात विरोधी पक्षनेत्याला वेतन आणि भत्ते चालू झाले.

**विरोधी पक्षांची भुमिका**

विरोधी पक्षांच्या भुमिकेची सुरूवात ख-या अर्थाने सरकारवर टीका करण्यापासून होते. वेळोवेळी सरकारच्या चुकीच्या धोरणावर टीका केली जाते. सरकारच्या चुका जनतेसमोर मांडून जनतेचे लोकमत आपल्या बाजूने करण्याचा प्रयत्न केला जातो. सरकार कसे चुकीच्या धोरणाचा स्वीकार करत आहे हे स्पष्ट केले जाते.

सरकार नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्षाकडून अविश्वास प्रस्ताव व अनेक इतर प्रस्ताव मांडले जातात. 1) स्थगन प्रस्ताव 2) काम रोको प्रस्ताव 3) निंदाव्यंजक प्रस्ताव 4) कटोती प्रस्ताव 5) ध्यानाकर्षण प्रस्ताव असे विविध प्रकारचे प्रस्ताव कायदेमंडळामध्ये विरोधी पक्षाकडून मांडले जातात.

अधिवेशनाच्या काळात सभागृहामध्ये सत्तारूढ पक्षाच्या मंत्रीमंडळातील सदस्यांना, प्रश्न, उपप्रश्न, माहिती विचारण्याचे काम विरोधी पक्ष करणे हे प्रश्न व माहिती विविध विषयांवर, समस्येवर विचारले जातात. यामुळे एकंदर सरकारच्या संपूर्ण धोरणाचा माहिती सभागृहाला मिळते. यातून ख-या अर्थाने सरकारचे दोष स्पष्टपणे दिसून येतात. सरकारला दोन प्रकारचे प्रश्न विचारले जातात. 1) तोंडी प्रश्न 2 ) लिखित प्रश्न सार्वजनिक

महत्वाच्या विषयावर एखादा अल्पसूचनेत प्रश्नही विरोधी पक्षाकडून विचारला जात असतो.

विरोधी पक्षाकडून अविश्वास ठराव मांडला जातो. जेंव्हा सत्ताधारी पक्ष काटावर बहुमत असते. म्हणजे अनेक पक्षाचे मिळुन सरकार बनत असते. त्यावेळी अविश्वास ठराव मांडून सरकारला सत्तेवरून खाली खेचण्याचे महत्वाचे कार्य विरोधी पक्ष करत असतो.

कायदानिर्मितीचे महत्वाचे कार्य सांसदीय शासन पध्दतीमध्ये कायदेमंडळाकडून केले जाते. कायदा तयार करताना सरकार प्रमाणे विरोधी पक्षाला अत्यंत महत्व असते. विधेयकाचे दोन प्रकार असतात. 1) सरकारी विधेयक 2) गैरसरकारी विधेयक जे विधेयक सरकारतर्फे मांडले जाते त्याला सरकारी विधेयक असे म्हणतात तर विरोधी पक्षाकडून जे विधेयक मांडले जाते त्याला गैरसरकारी विधेयक असे म्हणतात. याशिवाय अनेक विधेयक मांडला जातात. उदा. धनविधेयक, सामान्य विधेयक, संविधान संशोधन विधेयक होय.

एखाद्या पहिले वाचन झाल्यास विरोधी पक्षाकडून अशी टीका केली जाते की, हे विधेयक कायदेमंडळाच्या अधिकारात येत नाही. दुसरे वाचनच्यावेळी विधेयकावर जी चर्चा होते त्यात विरोधी पक्षाची भुमिका महत्वाची असते. विधेयकावर चर्चा 'करण्यासाठी जी समिती नेमलेली असते. त्या समितीत विरोधी पक्षाचे सदस्य असतात. यावेळी जर सरकारचे बहुमत काठावर असेल किंवा दुस-या सभागृहात सरकारचे बहुमत नसेल तर विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्वाची गरज धनविधेयकाच्या बाबतीत विरोधी पक्षाची भुमिका प्रभावी असत नाही बहुमताच्या जोरावर घटनादुरूस्ती विधेयकाबद्दल विरोधी पक्षाची भुमिका महत्वाची असते. यामध्ये दोन्ही सभागृहाचे 2/3 बहुमत झाल्याशिवाय घटनादुरूस्ती करता येत नाही.

लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भुमिका सभागृहात आणि सभागृहाबाहेर सुध्दा महत्वाची असते. सभागृहाबाहेर विरोधी पक्षाची काय भुमिका असते याचा थोडक्यात आढावा घेऊ.

1) विरोधी पक्ष शासन आणि जनता या मधील दुवा म्हणून महत्वाचे कार्य पार पाडले जाते.
2) सरकारकडून जनतेची उपेक्षा केली जात आहे याची जाणीव विरोधी पक्ष जनतेला करून देतो.
3) सरकारच्या म्हणजे सत्ताधारी पक्षाच्या विरोधात लोकमत तयार करणे.
4) विरोधी पक्ष जनतेच्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव करून देतो.
5) अविश्वासाच्याद्वारे जनतेला आपल्या पक्षाकडे आकर्षीत करून घेण्याचे कार्य विरोधी पक्ष करतो.
6) जनतेमध्ये राजकीय जागृती निर्माण करणे व राजकीय शिक्षण देण्याचे कार्य करणे.
7) निवडणूकीसाठी घोषणापत्र तयार करणे व त्याचा प्रचार व प्रसार करणे.
8) सार्वजनिक धोरण तयार करणे व जनतेला त्याची माहिती देणे.
9) निवडणूकीत जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी आर्थिक, राजकीय,सामाजिक धोरणाचा प्रचार व प्रसार करणे.
10) लोकशाही ही अत्यंत महत्वाचे व्यवस्था आहे ती आपल्या देशात रूजली पाहिजे व तीचे संरक्षण झाले पाहिजे यासाठी प्रयत्न करणे.
11) देशात होणारे सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदविणे.

**संदर्भसूची**

1) Indian Government and Politic - J.C.Joshi
2) संसदीय प्रजतंत्र मे विपक्ष की भूमिका - डॉ. बन्सीलाल बाबेल
3) भारतीय सरकार एवं राजनीती - डॉ. एल.एस. श्रीवास्तव
4) भारतीय शासन एवं राजनीती - डॉ. पुखराज जैन
5) भारतीय संविधान शासन आणि राजकारण - प्रा. एस.ए. कुलकर्णी